स्थापना : २२ मार्च १९७० ✻ **नोंदणी क्र.**: एफ ३२६४

मुस्लीम सत्यशोधक मंडळ

सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल...

सी ८/२३, स्टेट बँक नगर, पंचवटी, पाषाण रोड,

पुणे ४११००८.

दूरध्वनी : ९८२२६७९३९१

email : tambolimm@rediffmail.com

Website : www.muslimsatyashodhak.org

कार्यालय : साने गुरुजी स्मारक, राष्ट्र सेवा दल,

पर्वती पायथा, पुणे ४११०३०.



हमीद दलवाई

(२९ सप्टेंबर १९३२ – ३ मे १९७७)

सप्रेम नमस्कार,

'माणसांच्या दुनियेत माणसांनीच न्यायाचे राज्य आणले पाहिजे. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी कुठलाही धर्म-रूढी-परंपरा यांचा अडसर येऊ नये. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या धर्माचे परीक्षण करावे व हा देश धर्मनिरपेक्ष लोकशाही राष्ट्र व्हावा, या विचाराने प्रेरित होऊन हमीद दलवाई यांनी १९६६ मध्ये सात तलाक पीडित महिलांचा मोर्चा काढून 'समान नागरी कायद्यासाठी' विधानसभेवर मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. संपूर्ण भारताचा दौरा करून मुस्लीम समाजातील बुद्धिजीवी वर्गाशी संवाद केला. समाजात आधुनिक-मानवतावादी विचार रुजावा, महिलांना न्याय्य हक्क मिळावेत यासाठी २२ मार्च १९७० रोजी 'मुस्लीम सत्यशोधक मंडळ'ची स्थापना केली. अनेक ऐतिहासिक कार्यक्रम आखले. वादळासारखे कार्य वाढले परंतु दलवाईंना अल्पआयुष्य लाभले व ३ मे १९७७ रोजी त्यांचे निधन झाले.

दलवाईंनंतर मंडळाचे कार्य थांबेल असे विरोधकांना वाटत होते. त्यांचा भ्रमनिरास झाला. मंडळाने अनेक कार्यक्रम आखले. आज मंडळ सुवर्ण जयंती वर्षाकडे वाटचाल करीत आहे.

अलीकडच्या काळात न्या. सच्चर समिती, न्या. रंगनाथ मिश्रा आयोग, डॉ. मेहमूद-उर-रेहमान अभ्यासगटाने समाजाची एकूणच दुरवस्था स्पष्ट करून काही शिफारशी केल्या; मात्र समाजाच्या विकासासाठी धोरणात्मक कार्यक्रम आखण्यात आले नाहीत. शासनाने, समाजातील अश्रफ गटाने आणि पुरोहित वर्गाने समाजाच्या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष करून त्यांचा राजकारणासाठी वापर केला.

मुस्लीम जगतात इस्लामच्या नावाने अल-कायदा, तालिबान, इसिस व तत्सम संघटना दहशत निर्माण करून बळी घेत आहेत याची अनेक उदाहरणे आपणास ज्ञात आहेत. भारतातही मुस्लीम जमातवादी शक्ती धर्मनिरपेक्ष एकात्मतेसमोर अनेक प्रश्न निर्माण करीत आहेत.

गेल्या काही वर्षांपासून सनातनी हिंदुत्ववादी संघटना अधिक आक्रमक होऊन धर्मनिरपेक्ष लोकशाही समाज निर्मितीत अडथळे निर्माण करीत आहेत. यामुळे समाजातील धार्मिक सलोखा धोक्यात आला आहे. डॉ. नरेंद्र दाभोळकर, मोहसिन शेख, कॉ. गोविंद पानसरे, डॉ. कलबुर्गी यांची हत्या झाली आहे. प्रक्षोभक विधाने

करून 'घरवापसी'सारखे कार्यक्रम होत आहेत. परिवर्तनवादी विचारांपुढे मोठे आव्हान उभे केले आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ सर्व प्रकारच्या जमातवादाविरोधात आवाज उठवत आले आहे. दलवाई विचार पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत आहे. मंडळाच्या कार्यकर्त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. **मंडळामार्फत खालील उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.**

✻ मुस्लीम सत्यशोधक पत्रिका ✻

मध्यंतरीच्या काळात खंडीत झालेली 'पत्रिका' पुन्हा सुरू करण्यात आली आहे. वाचकांनी याचे स्वागत केले आहे. ही पत्रिका 'त्रैमासिक' आहे. लवकरच ती 'द्वैमासिक' किंवा 'मासिक' स्वरूपात प्रकाशित करण्याचा मंडळाचा मानस आहे. मुस्लीम जगतातील घडामोडींची नोंद घेवून मंडळाच्या ध्येय-उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी लोकशिक्षणाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून या मुखपत्राची गरज आहे.

संपादक : **डॉ. शमसुद्दीन तांबोळी**

✻ हमीद दलवाई स्टडी सर्कल ✻

कार्यकर्त्यांचा अभ्यास व प्रशिक्षणासाठी स्टडी सर्कलची स्थापना झाली. केवळ कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाकडे लक्ष न देता मुस्लीम समाजातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षा देऊन तो शासकीय, निमशासकीय नोकरीत यावा या हेतूने मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गरीब विद्यार्थ्यांना महागडे मार्गदर्शन परवडत नाही. मुस्लीम विद्यार्थ्यांबरोबरच अन्य धर्मीय गरजू विद्यार्थ्यांना 'स्पर्धा मार्गदर्शन वर्गा'त प्रवेश दिला जातो. या वर्षापासून २५ विद्यार्थ्यांना पुणे येथील युनिक अकादमी, ज्ञानदीप अकादमी, ज्ञानज्योती अमादमीमध्ये नियमित प्रवेश मिळवून दिला जातो. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, शैक्षणिक साहित्य, ग्रंथालय आणि सातत्यपूर्ण मूल्यमापन इ. सुविधा देण्यात येतात.

प्रमुख : **प्रा. अझरुद्दीन पटेल**

✻ राष्ट्र सेवा दल येथील मंडळाचे कार्यालय ✻

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या कार्यकर्त्यांसाठी दर शनिवारी सायं. ५.३० ते ७.३० दरम्यान अभ्यास सत्राचे आयोजन केले जाते. तसेच मंडळाच्या कार्याचे

नियोजन, भूमिका ठरविण्यासाठी कार्यकर्ते आणि हमीद दलवाई स्टडी सर्कलचे विद्यार्थी येथे जमतात. तसेच येथे मुस्लीम महिला मदत केंद्राचे कार्यही चालते.

✻ मुस्लीम सत्यशोधक महिला मंच ✻

मुस्लीम महिलांच्या प्रश्नांवर मंडळाने सुरुवातीपासूनच अधिक लक्ष दिले आहे. समान नागरी कायदा अथवा व्यक्तिगत कायद्यात सुधारणा कराव्यात म्हणून विविध कार्यक्रम घेण्यात येतात. विवाह, विवाहपूर्व-विवाहोत्तर समुपदेशन, मार्गदर्शन, कायदा सल्ला व सहकार्य करतानाच महिलांना सन्मानाने जगता यावे, त्या आत्मनिर्भर व्हाव्यात, शिक्षणाचे प्रमाण वाढावे म्हणून मंच कार्य करीत आहे.

प्रमुख : **डॉ. बेनझीर तांबोळी**

✻ मुस्लीम सत्यशोधक युवा मंच ✻

महाविद्यालयीन युवक-युवतींच्या प्रश्नांवर कार्य करण्यासाठी आणि या तरुणांमध्ये उदारमतवादी विचारांचा प्रभाव वाढावा याकरिता मंच कार्यरत आहे. जमातवादाच्या वादळात तरुण कोंडीत सापडला आहे. अन्य धर्मीय समाज तरुणांकडे संशयाने पाहत आहे. काही भरकटलेले तरुण तथाकथित 'जिहाद'कडे ओढले जात असल्याचे बोलले जाते. 'लव्ह जिहाद'चे खोडसाळ आक्षेप होतात. अशा तरुणांना योग्य मार्गदर्शन व्हावे आणि युवाशक्ती सकारात्मकतेकडे वापरली जावी, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व्हावी म्हणून 'युवामंच' विविध उपक्रम राबविते.

प्रमुख : **समीर शेख**

✻ प्रोग्रेसिव्ह मुस्लीम फोरम ✻

राज्यात आणि देशात मुस्लीम प्रश्नावर उदारमतवादी भूमिका घेऊन कार्य करणाऱ्या अनेक संघटना आहेत. महिलांच्या प्रश्नाबरोबरच धर्मनिरपेक्ष लोकशाही समाज निर्मितीसाठी कार्य करणाऱ्या संघटनांमध्ये संवाद-सहकार्य-समन्वय निर्माण व्हावा यासाठी फोरम कृतिशील आहे. सत्यशोधक मंडळाबरोबरच प्रोग्रेसिव्ह मुस्लीम फोरम राष्ट्रीय पातळीवर अधिकाधिक कार्यक्रम घेण्याचा प्रयत्न करते.

✻ इतर नियमित उपक्रम ✻

मंडळाच्या कार्यात सातत्य आणि नियमितपणा यावा यासाठी स्वतंत्र आणि समविचारी संघटनांबरोबर विविध कार्यक्रम वर्षभरात आयोजित केले जातात. यात निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, दिनविशेष कार्यक्रम साजरे करण्यात येतात.

❋ वर्धापन दिन कार्यक्रम ❋

२२ मार्च हा मंडळाचा वर्धापन दिन आहे. या निमित्ताने विविध विषयांवर चर्चासत्र, मेळावे, प्रकाशन व पुरस्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या 'हमीद दलवाई स्मृती' पुरस्काराप्रमाणेच 'समाज प्रबोधन पुरस्कार' देण्यात येतो. रोख रक्कम, सन्मानपत्र, स्मृतिचिन्हाचा समावेश असणारा हा पुरस्कार सन्मानपूर्वक देण्यात येतो.

❋ हमीद दलवाई-दिनकरराव जवळकर स्मृतिदिन ❋

३ मे हा या दोन सत्यशोधकांचा स्मृतिदिन आहे. अल्प आयुष्यात विपुल लेखन व प्रत्यक्ष कार्यक्रम आखणाऱ्या या सत्यशोधकांचे स्मरण मंडळ आणि म. फुले समता प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येते. व्याख्यान, परिसंवाद, सत्कार व प्रकाशन यांसारखे कार्यक्रम या निमित्ताने आयोजित केले जातात.

❋ मौलाना आझाद जयंती व राष्ट्रीय शिक्षण दिन ❋

मुस्लीम सत्यशोधक मंडळ आणि अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेच्या वतीने ११ नोव्हेंबर हा आझादांचा जन्मदिन, 'राष्ट्रीय शिक्षण दिन' संयुक्तपणे आयोजित करण्यात येतो. मौलाना आझादांच्या शैक्षणिक योगदानाबरोबरच त्यांच्या उदारमतवादी विचारांचे स्मरण करण्यात येते. सध्याच्या शैक्षणिक प्रश्नांवर नामवंतांची व्याख्यानेही आयोजित करण्यात येतात. मंडळातर्फे प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सत्कार करण्यात येतो. गेल्या पाच वर्षांपासून हा उपक्रम राबविण्यात येतो.

❋ बकरी ईद निमित्त रक्तदान अभियान ❋

बकरी ईद हा मुस्लीम समाजातील महत्त्वाचा सण आहे. या सणाच्या दिवशी प्राण्यांची कुर्बानी देण्यात येते. या निमित्ताने काही 'वाद'ही होतात. कुर्बानीचा अर्थ अधिक समाजाभिमुख व्हावा, त्याग करण्याची मानसिकता वाढावी व सामाजिक सद्भाव वाढावा म्हणून मंडळामार्फत 'रक्तदान शिबिराचे' आयोजन करण्यात येते. समविचारी संघटनांच्या सहकार्य व समन्वयातून विविध ठिकाणी 'रक्तदान अभियान सप्ताह' राबविण्यात येत आहे.

✻ रोजगाराभिमुख शिक्षण घेणाऱ्यास शिष्यवृत्ती ✻

एस. एम. जोशी शिक्षण व आरोग्य निधीमार्फत गरीब-गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. मुस्लीम समाजातील अशा मुलांची शिफारस करण्यात येते व त्यांना आर्थिक मदत केली जाते. या व्यतिरिक्त मंडळ विविध सेवाभावी संस्था व शासकीय योजनांमार्फत विद्यार्थ्यांना मदतीचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करते.

✻ समविचारी संघटनांबरोबर संयुक्त उपक्रम ✻

राष्ट्रीय एकात्मता समिती, विषमता निर्मूलन समिती, लोकशाही उत्सव या समविचारी संघटना संलग्न आहेत. जातीय हिंसाचाराचा निषेध, विषमता निर्मूलन, संविधान सन्मान, धर्मनिरपेक्ष लोकशाही या विषयांवर विविध कार्यक्रम आखले जातात. यापूर्वी बकरी ईदच्या दिवशी मंडळ आणि राष्ट्रीय एकात्मता समितीने 'ईदगाह' वर जाऊन काश्मिर व ईशान्य भारतातील आपत्तीग्रस्तांना मदत देण्यासाठी निधी संकलन केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रौढ निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभागातर्फे बहिःशाल शिक्षण मंडळामार्फत विविध कार्यक्रम घेण्यात येतात. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, एस. एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशनही संयुक्तपणे कार्यक्रमाचे आयोजन करते.

हे सर्व उपक्रम नियमित चालवण्यासाठी आम्हाला आर्थिक सहकार्याची मोठी गरज आहे. आम्ही मंडळाचे कार्यकर्ते यासाठी विनम्र आवाहन करीत आहोत की आपण हे सहकार्य करावे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे खाते :

कॅनरा बँक, भवानी पेठ शाखा, पुणे ४२ येथे असून

बचत खाते क्र. 00361101010080

IFSC Code No. : CNRB0000361 **MICR Code :** 411015002 आहे.

तसेच मु. स. पत्रिकेचे आजीव सदस्यत्व घेऊन किंवा जाहिरातीच्या माध्यमातून पत्रिकेसाठी सहकार्य करण्याचे विनम्र आवाहन करीत आहोत !

मुस्लीम सत्यशोधक पत्रिकेचे खाते : बँक ऑफ इंडिया, शिवाजीनगर, पुणे.

बचत खाते क्र. 051710100004342

IFSC Code No.: BKID 0000 517 **MICR Code :** 411013016 आहे.

जाहिरनामा - नवी दिशा

हमीद दलवाई यांनी देशभर फिरून मुस्लीम समाजाचा अभ्यास केला, लेखन व संवादातून समाजाचे प्रबोधन केले आणि २२ मार्च १९७० रोजी आम्हां सहकाऱ्यांसह 'मुस्लीम सत्यशोधक मंडळा'ची पुणे येथे स्थापना केली.

आता मुस्लीम सत्यशोधक मंडळाची स्थापना होऊन चार दशकांचा काळ लोटला आहे. या काळात भारतातील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत दखल घेण्यासारखे खूप बदल झाले आहेत. या बदलांची नोंद घेऊन चळवळीच्या मूळ उद्दिष्टांमध्ये गुणात्मक बदल न करता काही विषयांच्या अग्रक्रमात बदल करून नवी दिशा ठरविणे आवश्यक झाले आहे म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळ पुढीलप्रमाणे भूमिका घेत आहे.

१. उदारमतवादी कुराणभाष्याचा आधार : इस्लाममध्ये कुराणाचा अर्थ सामान्य माणूससुद्धा लावू शकतो. तरीही मुस्लीम समाजात असा पुरोहित वर्ग निर्माण झालाच. इस्लामी धर्मशास्त्राचा अन्वयार्थ लावण्याचा अधिकार केवळ आपल्यालाच असून तो अर्थ सर्वांनी मान्य केला पाहिजे. अशी टोकाची भूमिका घेऊन उलेमांनी मुस्लीम समाजावर आपले प्रभुत्व व नेतृत्व लादले आहे. या पारंपरिक उलेमांच्या प्रभावातून मुस्लीम समाजाला मुक्त करणे ही मुस्लीम सत्यशोधक मंडळाची प्राथमिकता राहील. त्यासाठी कुराणाच्या प्रागतिक व उदारमतवादी भाष्यकारांचा आधार घेऊन मुस्लीम सत्यशोधक मंडळ यापुढे आपली वाटचाल करील.

२. मुस्लीम समाजासमोरील जमातवादाचे आव्हान : गेल्या काही वर्षांत हिंदू जमातवादाचे प्रचंड आव्हान मुस्लीम समाजासमोर उभे राहिले आहे. क्रिया–प्रतिक्रियात्मक स्वरूपात अस्तित्वात असणारा हिंदू जमातवाद आता उघडपणे आक्रमक आणि हिंसक झाला आहे. त्यामुळे मुस्लीम समाजातही जमातवादी वृत्ती वाढत आहे; पण एका समाजातील जमातवादाला दुसऱ्या समाजातील जमातवाद हे उत्तर होऊ शकत नाही. त्याचबरोबर जातीयवादी दंगली कुणामुळेही तसेच कुठल्याही कारणास्तव सुरू झाल्या तरी अंतिमतः त्यात अल्पसंख्य समाजाची जीवित व वित्तहानी अधिक होते. त्यामुळेच सामान्य मुस्लीम असुरक्षित, हतबल व अगतिक झाला आहे. अशा परिस्थितीत मुस्लीम समाजातील जातीयवादी प्रवृत्ती व संघटना यांच्याविरुद्ध भूमिका घेत असतानाच मुस्लीम सत्यशोधक मंडळ हिंदू जमातवादाच्या विरोधातही निःसंदिग्ध भूमिका घेईल. भारतीय समाज बहुधार्मिक, बहुभाषिक, बहुसांस्कृतिक समूह घटकांनी तयार झाला आहे. अशा वैविध्यपूर्ण

समाजात राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यास सहिष्णूतेच्या आधारावर परस्पर सामंजस्य व भावनिक एकता निर्माण करणे आवश्यक असते, त्याचे भान ठेवून मुस्लीम सत्यशोधक मंडळ या दृष्टीने सतत प्रयत्नशील राहील. त्याचबरोबर हिंदू वा इतर समाजात अशा तऱ्हेच्या प्रागतिक व्यक्ती, संघटना वा चळवळी असतील त्या सर्वांशी मुस्लीम सत्यशोधक मंडळ सर्वतोपरी सहकार्य करील. मात्र मुस्लीम किंवा हिंदू समाजातील कुठल्याही प्रतिगामी, जातीयवादी प्रवृत्ती, संघटना वा व्यक्ती यांपासून मुस्लीम सत्यशोधक मंडळ, त्याचे सदस्य आणि कार्यकर्ते कटाक्षाने दूर राहतील.

३. सेक्युलॅरिझम व निरीश्वरवाद याबद्दल भूमिका : विविधतेतून एकात्म समाज निर्माण करण्यासाठी व सामाजिक न्याय, समता या मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी भारत सेक्युलर राष्ट्र झाले; पण सर्वच सेक्युलर राजकीय पक्षांनी त्यांच्या सोयीप्रमाणे मतांचे गणित मांडून सेक्युलॅरिझमचा अर्थ लावला. सेक्युलॅरिझमचा हा अर्थ मुस्लीम सत्यशोधक मंडळाला मान्य नाही कारण तो अर्थ भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत स्वीकारल्या गेलेल्या मानवी मूल्यांच्या विरोधात जातो म्हणूनच धर्म, जाती, लिंग, वर्ण, भाषा इ. कसलेही भेद न मानता सामाजिक न्याय आणि समता या मानवी मूल्यांवर आधारित एकात्म समाज निर्माण करण्यास साहाय्यभूत होणारी विचारप्रणाली म्हणजे सेक्युलॅरिझम हा सेक्युलॅरिझमचा अर्थ मुस्लीम सत्यशोधक मंडळाला अभिप्रेत आहे. अशा तऱ्हेचा एकात्म समाज निर्माण करण्यात मुख्य अडसर असतो तो धर्मसत्तेचा ! मग ती धर्मसत्ता कुठल्याही प्रकारची असो. म्हणून समाजकारण, राजकारण आणि धर्मसत्ता यांची फारकत केल्याशिवाय सामाजिक न्याय व समता यांवर आधारित एकात्म समाज निर्माण करता येणार नाही; अशी मुस्लीम सत्यशोधक मंडळाची धारणा आहे. त्याचबरोबर सेक्युलॅरिझम म्हणजे निरिश्वरवाद हे समीकरणही मुस्लीम सत्यशोधक मंडळाला मान्य नाही. व्यक्तिस्वातंत्र्याचा भाग म्हणून एखादी व्यक्ती निरीश्वरवादी असू शकते. त्याला कुणाचा विरोध असण्याचे काही कारण नाही. पण निरीश्वरवादाचे समर्थन, पुरस्कार किंवा विरोध करणे ही मुस्लीम सत्यशोधक मंडळाची भूमिका नव्हती व पुढेही असणार नाही.

४. भारतीय मुस्लीम समाजाच्या विकासाचे स्वप्न : स्वातंत्र्योत्तर काळात सर्वच राजकीय पक्षांनी मुस्लीमांचा केवळ मतपेटी (व्होट बँक) म्हणून विचार व वापर केला. त्यामुळे समाजाचे रोजीरोटीचे व आर्थिक विकासाचे प्रश्न सतत दुर्लक्षित राहिले. आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या अनेक आयोगांच्या व सर्वेक्षणांच्या अहवालातून

हे विदारक सत्य बाहेर आले आहे. सुदैवाने केंद्र शासनाने अलिकडे या वास्तवाची दखल घेऊन मुस्लीम समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी काही ठोस पावले उचलण्याचे जाहीर केले आहे. मुस्लीम सत्यशोधक मंडळ अशा नव्या शासकीय धोरणांचा सतत पाठपुरावा करील. त्याचबरोबर अन्य मागासवर्गीयांच्या विकासासाठी ज्याप्रमाणे शासकीय सवलती, सुविधा मिळतात त्या मुस्लीम समाजातील दुर्बल घटकांनाही मिळाव्यात म्हणून मुस्लीम सत्यशोधक मंडळ आग्रही राहील.

मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासात उलेमांच्या सनातनी भूमिकेमुळे अडसर निर्माण झाला आहे. या समाजाच्या शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ विविध पातळ्यांवर प्रयत्न करील.

५. मुस्लीम महिलांच्या समस्या : मुस्लीम महिलांवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अन्याय–अत्याचारांचे प्रश्न मुस्लीम सत्यशोधक मंडळाने नेहमीच ऐरणीवर आणून ते दूर करण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्न केले आहेत; परंतु उलेमांनी शरियत 'दैवी' म्हणून अपरिवर्तनीय आहे, अशी भूमिका घेऊन या प्रयत्नांना सतत विरोध केला आहे. वास्तविक इस्लामी धर्मशास्त्र व इतिहास यांच्या दृष्टीने उलेमांची ही भूमिका चुकीची आहे. इस्लामच्या सुरुवातीच्या काळापासून तत्कालीन इस्लामी धर्मशास्त्राच्या विद्वानांनी शरियतकडे समाजशास्त्र म्हणून पाहिले व त्याचा सतत विकास केला, हा इतिहास आहे. १३व्या शतकानंतर उलेमांनी पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाखाली ही विकासाची प्रक्रिया बंद केली. आजही हीच भूमिका घेऊन हे मुस्लीम समाजाची दिशाभूल करीत आहेत. या त्यांच्या चुकीच्या भूमिकेमुळे मुस्लीम स्त्रियांवर अन्याय होत आहे.

शरियत दैवी असल्यामुळे अपरिवर्तनीय आहे, अशी उलेमांची भूमिका आहे. वास्तविक मुस्लिमांच्या विविध पंथांमध्येसुद्धा एकाच प्रकारचे शरियत कायदे नाहीत किंबहुना त्यात प्रचंड विविधता आहे म्हणूनच जगातील अनेक मुस्लीम राष्ट्रांनी शरियत कायद्यात कालसुसंगत बदल करून एका दमात तीन तोंडी तलाक देण्यास प्रतिबंध करण्यासारखे कायदे केलेले आहेत. ब्रिटिशांनी लागू केलेल्या १९३७ च्या मुस्लीम व्यक्तिगत कायद्यातही शरियतचा बहुसंख्य भाग रद्द करुन तलाक, बहुपत्नीत्व, वारसाहक्क, मूल दत्तक विधान एवढ्यापुरताच भाग ठेवला आहे. हा कायदासुद्धा मुस्लीम महिलांवर अन्याय करणाराच आहे. त्यामुळे १९३७ च्या मुख्य कायद्यातही कालसुसंगत व न्याय्य बदल झाले पाहिजेत. अशी मुस्लीम सत्यशोधक

मंडळाची ठाम व आग्रही मागणी आहे म्हणून भारतीय संसदेने विद्यमान कायद्यात न्यायसंगत बदल करावेत. मुस्लीम महिलांना संविधानात्मक अधिकार मिळावेत तसेच– मुस्लीम समाजानेही अशा कायद्यांचे स्वागत करावे यासाठी मुस्लीम सत्यशोधक मंडळ प्रयत्नशील राहील.

६. देशासमोरील संवेदनशील समस्या : काश्मीर, दहशतवाद, बाबरी–मशिद–रामजन्मभूमी, समान नागरी कायदा यांसारख्या विद्यामान व भावी काळात निर्माण होणाऱ्या संवेदनशील समस्यांबाबत मुस्लीम सत्यशोधक मंडळ नेहमी बुद्धिवादी व वैज्ञानिक दृष्टिकोन आणि न्याय व देशहित यांच्याशी सुसंगत अशी भूमिका घेईल व त्याविषयी सतत आग्रही राहील.

मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या चळवळीचे वर्तमान व भावी कार्यक्रम निश्चित करताना भारतीय संविधान, त्यात अभिप्रेत असलेली सामाजिक न्याय, समता व बंधुत्व ही मानवी मूल्ये, समान नागरिकत्व, त्यांचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्य या बाबी आधारभूत धरूनच मुस्लीम सत्यशोधक मंडळ आपल्या कार्यक्रमांची भावी दिशा निश्चित करेल.

‘ज्या हिंदूंना मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार करावयाचा आहे, ते हिंदूंना सनातनी बनविण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि ज्या हिंदूंना हिंदू समाजाला आणि पर्यायाने देशाला आधुनिकतेच्या रस्त्याने न्यावयाचे आहे ते मुस्लीम जातीयवाद्यांना मिठ्या मारीत आहेत. हे दृश्य बदलले पाहिजे. मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार करणाऱ्या हिंदूंच्या मी बाजूचा आहे; पण हिंदूंना सनातनी बनविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा मी विरोधक आहे. त्याचबरोबर हिंदूंना आधुनिक बनवणाऱ्यांना माझा पाठिंबा आहे; परंतु मुस्लीम जातीयवादाचा प्रतिकार न करण्याच्या त्यांच्या धोरणाचा मी विरोधक आहे.’

– हमीद दलवाई

हमीद दलवाई यांनी आपल्या नावाने कोणतेही स्मारक नसावे अशी इच्छा व्यक्त केली होती.. परंतु त्याना अपेक्षित असलेली समाजप्रबोधनाची चळवळ मुस्लीम समाजात रुजविणे आणि विशुद्ध विज्ञानवादी दृष्टिकोण असणारे, परिवर्तनशील, सेक्युलर लोकशाही अशी संविधानिक मूल्ये अगीकृत करणारे तरुण– तरुणी निर्माण करणे हेच त्यांचे खरे स्मारक ठरेल.

– शमसुद्दीन तांबोळी

अध्यक्ष, मुस्लीम सत्यशोधक मंडळ

: मंडळाचे विनम्र आवाहन :

मंडळाच्या सुवर्ण जयंती वर्षानिमित्त मंडळाने राज्य व राष्ट्रीय पातळीवर विविध उपक्रम राबवण्याचे निश्चित केले आहे. मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक प्रश्नांसंदर्भात लोकानुनय टाळून लोकशिक्षण होण्याची गरज आहे. या दृष्टिकोनातून मंडळाचे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवण्याचा निर्धार आहे.

मुस्लीम सत्यशोधक मंडळ जवळपास पन्नास वर्षांपासून मुस्लीम समाज प्रबोधनासाठी कार्यरत असूनही मंडळास स्वत:चे छोटे कार्यालयसुद्धा नाही. स्वत:च्या कार्यालयाअभावी कार्यसंस्कृती अधिक नियमित, शिस्तबद्ध आणि गतिमान करण्यात अडथळे निर्माण होतात.

मंडळाने आजतागायत मंडळाच्या कार्यालयासाठी कोणतीही आर्थिक मदत मागितली नाही. मंडळाच्या सुवर्णजयंती वर्षानिमित्त आम्ही पहिल्यांदाच कार्यालय निधी संदर्भात आवाहन करीत आहोत. मुस्लीम सत्यशोधक मंडळाविषयी आस्था आणि सहानुभूती असणाऱ्या मान्यवरांना आम्ही विनंती करीत आहोत की आपण अधिकाधिक आर्थिक साहाय्य करून **मुस्लीम सत्यशोधक मंडळ कार्यालय वास्तु निधी**साठी योगदान द्यावे.

आपण दिलेली आर्थिक मदत फक्त आणि फक्त कार्यालय वास्तुसाठीच वापरली जाईल, अशी आम्ही ग्वाही देतो.

कृपया आपला धनादेश **'मुस्लीम सत्यशोधक मंडळ कार्यालय वास्तु निधी'** या नावाने द्यावा किंवा ही मदत याच कारणास्तव उघडण्यात आलेल्या बँक खात्यावर पुढील तपशीलाप्रमाणे जमा करावी ही विनंती.

खाते - **'मुस्लीम सत्यशोधक मंडळ कार्यालय वास्तु निधी'**

बँक - कॅनरा बँक, भवानी पेठ, पुणे ४२.

बचत खाते क्रमांक : 03611010181297

IFSC Code No. : CNRB0000361

MICR Code : 411015002

मंडळाच्या सुवर्ण जयंतीनिमित्त आगामी प्रकल्प....

- मंडळाचे सुरुवातीचे अध्यक्ष-स्वातंत्र्यसैनिक बाबुमियाँ बँडवाले यांच्या स्मरणार्थ 'राष्ट्रीय एकात्मता - सामाजिक सलोखा' पुरस्कार. (हा उपक्रम मार्च २०१७ पासून सुरू केला आहे.)
- मुस्लीम समाजाच्या उन्नतीसाठी विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांना 'फातिमाबी शेख कार्यगौरव सन्मान.' (उपक्रम मार्च २०१७ पासून सुरू.)
- मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे स्वत:चे कार्यालय.
- हमीद दलवाई स्टडी सर्कल व अभ्यासकांसाठी ग्रंथालय.
- समान नागरी कायद्याचा मसुदा तयार करण्याचा आग्रह करणे किंवा मुस्लीम व्यक्तिगत कायद्यात संविधानात्मक अधिकारासाठी सुधारणा मागणी.
- मुस्लीम सत्यशोधक पत्रिका - मासिक स्वरूपात.
- मंडळाचे सुधारणावादी कार्य विस्तार करण्यासाठी विविध राज्यांत शाखा निर्माण करून हे कार्य राष्ट्रीय स्तरावर करणे.
- हमीद दलवाई यांचे अप्रकाशित लेख, पत्रव्यवहार, भाषणे एकत्र करून प्रकाशित करणे.
- मुस्लीम समाजातील मागास घटकांच्या शैक्षणिक - आर्थिक विकासासाठी पाठपुरावा.

* **अध्यक्ष** : प्रा. शमसुद्दीन तांबोळी, पुणे
* **उपाध्यक्ष** : प्रा. सायरा मुलाणी, कोल्हापूर
* **कार्यवाह** : प्रा. जमीर शेख, भोर
* **सहकार्यवाह** : प्रा. अझरुद्दीन पटेल, कराड
* **खजिनदार** : दिलावर शेख, पुणे
* **सदस्य** : तमन्ना इनामदार, पुणे
नियाज अत्तार, कोल्हापूर

साई समर्थ प्रिंटर्स, पुणे. ✆ ९८९०३६३६४८